

### विद्रोही अनुभूतीचा ज्वलंत अविष्कार

# 'शापित सूर्य'

कवी - **दादू मांद्रेकर**

समीक्षक
**डॉ. सोमनाथ कोमरपंत**

**श्री**. दादू मांद्रेकर यांची 'शापित सूर्य' या कवितासंग्रहातील कविता विद्रोही कविपरंपरेतील प्रभावी कविता आहे. गोमंतकाच्या परिसरात या कवीची जडणघडण झालेली असली, तरी डॉ. आंबेडकरांच्या समतासंगरापासून त्यांच्या कवितेने प्रेरणा घेतलेल्या आहेत. या कवितांचे अंत:स्वरूप पाहता, त्या सामाजिक आशयाच्या आहेत हे सहज जाणवते. आजवरच्या आयुष्यात भोगलेल्या दु:ख-व्यथांचे ओरखडे कायम असल्यामुळे संवेदनशील मनाच्या तीव्र प्रतिक्रिया या कवितांतून जाणवतात. दलित कवितेत आजवर व्यक्त झालेल्या अंत:सुरांशी कवितेचे साम्य आहे. काही ठिकाणी व्यथेचे रूप निराळे वाटते. अर्थात् ते त्यांच्या वैयक्तिक पिंडातून स्फुरलेले. 'शापित सूर्य' हा दादू मांद्रेकरांचा पहिला कवितासंग्रह आहे; पण पहिलेपणाच्या खाणाखुणा त्यात दिसत नाहीत. आत्मनिर्भर वृत्ती, संपन्न शब्दकळा आणि तिचा समर्थ आविष्कार यांचा गुणसंगम 'शापित सूर्य' मध्ये आढळतो. येथील परिसरात राहून पहिल्यांदा विद्रोही सूर प्रकट करणाऱ्या या कवितेचे आशयमूल्य महत्त्वाचे आहे; पण या कवितेतील अनुभवविश्वाच्या काही मर्यादाही जाणवतात. विद्रोही कवितेतील ठराविक संकेतांचे अनुकरण करण्यात ती धन्यता मानते. काही ठिकाणी अकारण चढा सूर लावते. त्यामुळे संवेदनशील कविमनाच्या उत्कट प्रतिक्रिया त्या गदारोळात घुस्मटून जातात, कविस्वर विरतो आणि कविता प्रतिनिधिक दु:खव्यथेच्या पातळीवरच राहते. 'शापित सूर्य' या नामाभिधानात जो प्रतीकात्म आशय व्यक्त होऊ पाहतो, तो सामाजिक संदर्भात सूचक

आहे. ही सूचकता काव्याभिव्यक्तीत ही व्यापून राहिली असती, तर या कवितेचे मूल्य निश्चित वाढले असते.

'वेशीवरून' या मनोगतात दादू मांद्रेकरांनी आपल्या आत्मनिष्ठ स्वराविषयी जे सूतोवाच केले आहे, ते ध्यानात घेणे जरूरीचे वाटते.

'माझी कविता स्खलनशील आहे, की नाही याची मला जाणीव नाही. ती ज्वलनशील आहे, की नाही याचीही मला कल्पना नाही; पण माझी कविता ही अस्सल, माझ्या वेदनांची वीण आणि वीणा झालेली आहे. भारतीय विषम समाज-व्यवस्थेची भीषण, दारूण आणि करूणही शोकांतिका कोरीत ती जखमेसारखीच वहात आहे हे सत्य होय.'

'शापित सूर्य' मधील कवितांमधून दादू मांद्रेकर यांनी आपल्या मानसिक कल्लोळांना वाट करून दिलेली आहे. भारतीयत्वाचा अभिमान मनात बाळगत असताना अंतर्यामी सल मात्र कायम राहतो. 'सारे भारतीय माझे बांधव आहेत' हे ठीक आहे. पण मी त्यांचा आहे का? हा प्रश्न अनुत्तरित राहतो. काही सत्ये ही बहुपांगी असतात. काही सत्ये भीषण असतात. कवीच्या चिंतनशीलतेतून प्रकटलेले सत्यही असे निराळे आहे. अंतर्मुख करणारे आहे :

'शेवटी या पुस्तकातल्या
खुणा आहेत
पुस्तकातच करायच्या
खऱ्या खुणा करण्यासाठी
काळजं चिरावी लागतात
शिळेवर आलेख
कोरावा तशी.'

दलित कवितेत आईविषयीची कृतज्ञता अनेक कवींनी नानाविध आविष्कारांनिशी प्रकट केलेली आहे. दादू मांद्रेकर यांची 'आई' ही कविता हृदय पिळवटून टाकणारी आहे. तीमधील करूणाभाव प्रत्यक्ष अनुभवावर आधारलेला आहे.

आईच्या वाट्याला आलेल्या दुःखामुळे कविमनाला तीव्र वेदना होतात. या दुःखाची कारणमीमांसा करताना जो सामाजिक संदर्भ अभिव्यक्त झालेला आहे, त्यावरून त्या संवेदनशील मनाची प्रगल्भता उमजून येते. शिक्षणाचे संस्कार नसलेल्या, पण उपजत शहाणपण असलेल्या आईशी कविमन संवाद करते.

'कुरूक्षेत्र' या कवितेत सामाजिक आशय व्यक्त करताना महाभारतातील व्यक्तिरेखांचा अन्वयार्थ लावलेला आहे. येथे मूळ महाभारतीय महाकाव्याची संरचना आणि आधुनिक जीवनसंदर्भातील विषमतेवरील भाष्य यांची सांधेजोड चुकीच्या पायावर आधारलेली आहे असे प्रांजळपणे वाटते. दलित कवितेत प्राक्कथांची आशयानुरूप

अशी मांडणी नव्याने करण्याचा अनेकांनी प्रयत्न केलेला असला, तरी 'कुरुक्षेत्र' मधील भावनोद्रेकाला तर्काची बैठक लाभत नाही. त्यामुळे या कवितेचा जितका व्हायला हवा तसा परिणाम होत नाही. तुलनेने 'शहर सापडले' ही कविता वाटते. तीवर पूर्वसुरींचा प्रभाव आहे. चातुर्वर्ण्याधिष्ठित सामाजिक व्यवस्थेविषयीचा निषेध व्यक्त करण्यासाठी उपहास, उपरोध या आयुधांचा या ठिकाणी कवीने सर्व शक्तिनिशी वापर केलेला आहे. पण ही कविता वक्तृत्वगुणांनी युक्त आहे. तथाकथित संस्कृतीवर 'क्ष' किरण टाकण्याचा कवीचा प्रयत्न चांगला आहे. पण तीत सूचकतेचा अभाव आहे.

'कळस' या कवितेतील मजुरी करणाऱ्या माऊलीहृद्यातील कारूण्याचे कवीने हृदयद्रावक वर्णन केलेले आहे :

'आपले पोटही आता
बाळसेदार होऊ लागले बिल्डिंगसारखे
आपण पोटूशी राहिलेय
आता डोहाळ्यांचे मांड नकोत
दिवसांचे खाडे नकोत
आपण बाळासाठी पिसले पाहिजे
अधिक कंबर कसली पाहिजे
आपले बाळंतपण हॉस्पिटलात न झाले
म्हणून काय झाले?
कुठल्यातरी झुडुपाच्या आडोशाला
रस्त्याच्या कडेला होते हे काय कमी आहे?'

पुत्रजन्माच्या वेणा सहन करीत ती असहाय परिस्थितीतदेखील उदरनिर्वाहासाठी कष्ट सोसत आहे. वात्सल्याने ती ओथंबलेली आहे. ती उद्‌गारते:

'तिकडे बिल्डिंगवर कळस नी
इकडे माझ्या पोटावर कळस
नक्षी कोरावी तसा
उतरत होता
लबाड आत ढुशी देत होता
लाथा मारत होता
तीळ तीळ दुसऱ्यासाठी झटणाऱ्या जगाचा
उगाच अभिमन्यूसारखा कानोसा घेत होता'

या कवितेतून कष्टकरी समाजातील स्त्रीच्या व्यथेद्वारे एक करूण कहाणीही साकार झालेली आहे. 'अभिवादन' या कवितेत मानवमुक्तीचा ध्यास व्यक्त झालेला आहे.

त्याला प्रदेशाची, माणसाच्या जातीपातीची बंधने नाहीत. वैश्विक पातळीवरील मानवतेचे निरामय विश्व साकार करणारी मनाची उभारी येथे प्रकट होते. नवनिर्माणाची पालवी बहरू लागते.

'जनानखाना', 'गर्भपात करायचा आहे', 'बिनचेहऱ्याची माणसं', 'त्या चारजणी' आणि 'तो दिवस' या कवितांतील आशयाचे ताणे-बाणे पाहिले असता आपल्या संस्कृतीतील विसंवादाविषयी ते भाष्य आहे असे जाणवते. या दृष्टीने या कवितांतील संस्कृतिविषयक उल्लेख अधोरेखित करावेसे वाटतात. त्यातील तपशील देण्याची आवश्यकता नाही.

'प्रिये' या कवितेत प्रियेस उद्देशून केलेला हृदयसंवाद आढळत असला, तरी या कवितेचा आशय सामाजिक आहे. सामाजिक विषमतेमुळे शाश्वत प्रेमभावनाही आपण अनुभवू शकत नाही, अशी खंत या कवितेतील नायक प्रकट करतो. अंतर्विरोधाने व्यापलेल्या जगताचे दर्शन या कवितेच्या शेवटी कवीने केलेले आहे, ते अस्वस्थ करणारे आहे. उपमा-प्रतिमांचा विशेष वापर न करता अनुभवप्रामाण्य ही कसोटी मानून ही कविता रसिकांशी बोलत असते.

आधुनिक काळातही देवराल गावात एका स्त्रीवर सती जाण्याचा प्रसंग येतो, तेव्हा या कविमनाची कालवाकालव होते. त्याच्या संवेदनशील मनात भारतातील पुरोगामी चळवळीचा संपूर्ण पट उभा राहतो. एवढे प्रयत्न होऊनही आपण नर्मदेतील गोटे कसे राहिलो याची जीवघेणी जाणीव त्याच्या मनात घर करते. या प्रदीर्घ कवितेतील आशयातही रामायणातील कथानकाची मोडतोड कवीने केलेली आहे. पुनरावृत आशय इथेही येतो. कवीची आत्मनिष्ठ वृत्ती मात्र प्रखर स्वरूपात पुढील ओळींत आढळते:

'..आणि माझा मीच आजवर जळत जातो भट्टीसारखा
त्यावेळी तुझा भेसूर भविष्यकाळ
सभोवार रूंजी घालतो उत्थानगुंफा भिरभिरल्यागत
नि मन थरकापून उठते
तुझी अभिव्यक्ती पुन्हा एकदा
संस्कृतीच्या काळ्याकभिन्न कोनाड्यात'

दलित विश्वात शिक्षणाचा संस्कार झाल्यामुळे नवी जाणीव निर्माण झालेली आहे. असहायपणे मूक आक्रंदन करणाऱ्या दलितांच्या अंतर्मनात हा अग्नी नव्याने प्रज्ज्वलित झाला. तेव्हा प्रस्थापितांच्या जगात त्याविषयीची जहाल प्रतिक्रिया उमटायला लागली. पण हे सारे आता अटळ आहे. नव्या परिवर्तनशीलतेच्या दिशा सूचित करणारे हे जीवनभाष्य 'पुस्तक' या कवितेत प्रभावी रीतीने आलेले आहे :

'..आम्हांला पाटीचा अर्थ समजू लागल्यापासून
तर हल्ली पुराणकथांच्या 'इतिहासाची' पुस्तकेही
दात-ओठ खात बरीच

चवताळून उठू लागतील
आपली संस्कृती उठून चालली म्हणून.
पण करणार काय?
सूर्याने रखरखीत वाळवंटातील
पत्थरच शिलगावल्याने
आता वाळूही पेटून उठलीय
वेदनेचे पुस्तक बनून,

डॉ. आंबेडकरांच्या विचारांच्या प्रभावामुळे दलितांची मन:क्रान्ती झालेली आहे. कवीने या नव्या उष:कालाचे या कवितेत स्वागत केलेले आहे.

'फाशी' ही कल्लू आणि फकीरा यांना उद्देशून लिहिलेली कविता असली, तरी तिचा आशय केवळ प्रासंगिक राहिलेला नाही :

'... आणि भळभळणारी जखमच बनून राहिलेल्या
'हिंदुस्थान' शब्दाला फाशी द्या
भारत नावाच्या तख्तावर'

या ओळींतून कवीच्या जीवनप्रणालीवर प्रकाश पडतो. आपल्या भावभावनांच्या उद्रेकाला वाट करून देताना इतिहासाच्या अनेक प्रमादांचा पाढा कवीने धीटपणे वाचलेला आहे.

डॉ. आंबेडकरांसारख्या क्रांतदर्शी महापुरूषाला उद्देशून लिहिलेली कविता अत्यंत प्रभावी आहे. मानवतेच्या ध्यासाने प्रेरित झालेली त्यांच्यासारखी व्यक्ती हजारो वर्षांतून एकदाच जन्मास येते असे कवीला वाटते. डॉ. आंबेडकरांसारखा क्रांतिकारक लाव्हापासून चंदन बनून पावसासारखा बरसतो किंवा दीपराग बनून जळलेलीच मने वणव्यासारखा शिलगावू शकतो. त्याच्यासारखा क्रांतिकारक बुद्धाचे लेणे मनावर कोरीत बोधिवृक्ष होऊन आभाळ फाटू पहातो. तेव्हा गदगदलेले कढ आणि संस्कृतीने विटाळलेले दु:खाश्रू आनंद होऊन पाझरू लागतात. अंगार बनलेल्या डोळ्यांडोळ्यांतून मेणबत्ती जळल्यागत होते. अग्निजन्य खडकांतून झरे फुटण्याची प्रक्रिया सुरू होते. मेलेली मने पान्हावल्यागत होतात. अशा शब्दांतून ओसंडणारी आत्मीयतेची, कृतज्ञतेची भावना व्यक्त होते -

'तू झालास म्हणून
मी माणूस झालो
किंवा माणसांत तरी आलो'

या शब्दांतून तिचा परमोच्चबिंदू साधला जातो.

'लोकशाहीच्या हुतात्म्यांनो', 'मंडेला सुटतो तेव्हा', 'देवा' या कवितांतून लोकशाही, स्वातंत्र्य आणि बुद्धिप्रामाण्यवाद यांवर आधारलेल्या मूल्यसरणीवरील श्रद्धा

प्रकट होते. पण ही कविता शब्दबंबाळ होते, ही तिची मर्यादा आहे.

'तथागता' ही या संग्रहातील लक्षणीय कविता आहे. गौतमबुद्धाच्या संजीवक शक्तीचा साक्षात्कार प्रतिमा-प्रतीकांतून साकार होताना कवीला जाणवतो -

'शिल्पशब्दांच्या नाजूक ओठांनी
तेव्हा भुयारांची काळीकभिन्न
कोठारेही पाझरू लागतात
अजिंठ्या-वेरूळाच्या लयदार लेण्यांनी
बोधिवृक्षाच्या पानापानांवर कोरलेली
प्रज्ञा करूणेची सळसळ
झुळमुळतेय चांदण्याच्या सावलीसारखी
नि पंचशीलाची भोवळ
हळुवार स्पर्शून जाते
मोरपंखागत मनभर काळीजभर
तू कस्तुरीमृगासारखा
दरवळत होतास
इथेच माझ्या आसपास.'

तुडुंब विषमतावादी नरकात लाचार जिण्हेने, नग्न मनाने किड्यागत वळवळत असताना आंबेडकरांच्या रूपाने शांतिदूत भेटला आणि त्याने उन्नयनाची दिशा दाखविली.

'तू अवतरली नसतीस' मध्ये स्त्रीचा आदिशक्तीच्या रूपात गौरव केलेला आहे. पुरूषप्रधान संस्कृतीत स्त्री काळोखाचीच कैदी होत आहे, हा विसंवाद या कविमनाला क्लेश देत आहे. 'हे स्वतंत्रते...' या कवितेत स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या इष्ट - अनिष्ट बाबींचा परखडपणे जमाखर्च मांडलेला आहे. पण तीमधील प्रखर आशय तपशिलात हरवलेला आहे. तो निबंधवजा वाटतो. पण तीमधील -

'माते -
एकदा या शापित रक्तबंबाळ मनावर
तुझा इतिहासवज्र हात ठेवून
आशीर्वाद दे
तुला तिरंगाच नेसवण्याची
माझ्या मनाला बत्ती दे
धर्मांधाच्या मनोवृत्तीवर
थयथया नाचण्याचे
तुझे नैतिक बळ दे..!'

या वज्रनिर्धार प्रकट करणाऱ्या ओळी हृदयाचा ठाव घेतात. 'घर', 'सांजवेळ,' 'जळणं' 'जळकी रेषा', 'कावळे आणि गिधाडे', 'सुरूंग' 'रोटी' 'चित्रे' 'वाघनखे' व 'व्यथा' या कविता मिताक्षरी आहेत. त्यांतूनही सामाजिक बंडाची ठिणगी प्रखर स्वरूपात ठेवणे आता अपरिहार्य आहे, हे सत्य अधोरेखित केले आहे.

'सांगावा' या कवितेतील सामाजिक आशय संकेतनिष्ठ स्वरूपात प्रकट न होता 'फँटसी'च्या स्वरूपात येतो. कवी प्रारंभी उद्गारतो -

'पावसाचा झणझणीत
गारवा घेतलेले
काळेकुट्ट ढग आले
सांगावा घेऊन
कातरवेळी माझ्या दारी
सूर्य वारल्याची बातमी
मला त्यांनीच दिली.'

मनातील अंधाराच्या पार्श्वभूमीवर आशावादाचा दृढ संस्कार करणारा आणि नवनिर्वाणाची ऊर्मी प्रकट करणारा आशय येतो -

मी नीट काष्टी लावली
कष्टाचं घोंगडं खांद्यावर टाकलं
आणि पोटात पेटलेल्या
वणव्याच्या उजेडात
मोठ्या दु:खाने
काळोखात बोटे बुडविली
उद्याचा टिळा लावण्यासाठी
विधवा झालेल्या रातीला'

प्रचारात्मक मूल्य प्रकट करणाऱ्या कवितांतील आशयापेक्षा हा आशय अधिक संपन्न, सूचक आणि कलात्मक वाटतो. 'शापित सूर्य' ही कविता प्रभावी आहे :

'जाताना
अश्लील शीतलपणा जोखणाऱ्या
इथल्या चंद्रासहित
त्याच्या अनुयायांना
गटारगंगेत पिचवून
इथून छावणी हलवलेलीच बरी.'

या ओळींतून कविमानस प्रकट होते. 'शापित सूर्य' मधील कवितांतून झालेल्या मानसिक प्रतिक्रियांमधून समकालीन समाजवास्तवाच्या अधःस्तरांतुन पाझरणाऱ्या दुःखानुभूतीचे स्वरूप लक्षात येते. जळजळीत भाष्य करणाऱ्या या कविमनाची धारणा नकारात्मक नाही. भावकोमलतेचे अन् सृजनात्मकतेचे अंतःसूत्र मनात बाळगून समाजमनस्क वृत्तीने कवी चिंतन करतो. निसर्गाविषयी त्याला ममत्व वाटते. पावसाचे तो स्वागत करतो.

तरीदेखील दैन्यदारिद्यात दिवसरात्र घालविणाऱ्या लोकांविषयी अपार सहानुभूती असल्यामुळे पावसाचे आल्हाददायी रूप त्याच्या मनात ठसत नाही. लोकांचे संसार उघड्यावर टाकणारे त्याचे सर्वसंहारक रूप लक्षात राहते. सामाजिक विसंवादाच्या जाणिवेमुळे कविमन पोळलेले आहे. त्यामुळे त्याची सौंदर्यभावना थिजलेली आहे. म्हणून पावसाला उद्देशून तो उद्‌गारतो :

'पावसा, खरं सांग
तू कुणासाठी येतोस-
गंमत म्हणून पावसात
चिंब निथळणाऱ्या लहान-थोरांसाठी
की आसरा नाही म्हणून
हजार ठिकाणी विरलेल्या
आणि विटलेल्या लुगड्यात
उन्हापावसात घाम गाळीत
पुतळ्यासारख्या थिजणाऱ्या
नागड्या उघड्या बायका-पोरांसाठी...?'

गुलमोहरांची आठवण येताच अनेक कवींच्या संवेदनाविश्वात चैतन्य पालवते. अणुरेणू उमलून येतो. पण या कवीच्या अंतरंगात त्याची प्रतिमा शोकात्म रूप घेते :

'छाती फुटेपर्यंत गुदमरून
ठेवणारं एकाकीपण
त्याच्या वाट्याला का यावं?
आकाशाएवढं मोठं मन
तरीही तेवढंच वेदनांचं
रक्तासारखं
ओतीव ओझं लेवून
बेवारशी पुतळ्यासारखा
गुलमोहर उभा आहे.'

'पालखी' या कवितेत दलितांना पिढ्यानपिढ्या अगतिकतेचे जिणे जगावे लागते,

इतरांचा भार आपल्या उरावर वाहणे हेच त्यांचे भागधेय आहे, या आक्रंदनाला येथे वाचा फुटलेली आहे. अंतर्विरोधाने व्यापलेल्या जीवनाची कथा येथे साकार होते:

'दिवेलागण झुरे इथे
दूर उजेड दिसतो
पालखी वाहतो
वाटुली चालतो.'

'भारतीय मार्क्सवाद' मध्ये सैद्धान्तिक पातळीवर समतावादाचा पुरस्कार करणाऱ्यांच्या अंतरंगातील विसंगतीवर 'क्ष'- किरण टाकलेला आहे.

दादू मांद्रेकर यांची 'शापित सूर्य' मधील कविता 'स्व' विषयक जाणीव आणि सामाजिक वास्तव यांच्या आंतरसंबंधांचा अन्वय शोधणारी कविता आहे. सामाजिक विषमतेवर प्रहार करणारा विद्रोही कवी अशी प्रतिमा तीमधून निर्माण होते. समाजमनस्कता हेच या कवीचे बलस्थान आहे, याचा प्रत्यय या सर्व कवितांमधून येतो.

◆◆◆

पत्ता :
**डॉ. सोमनाथ कोमरपंत,**
प्राध्यापक आणि मराठी विभाग प्रमुख,
गोवा विद्यापीठ
ताळीगांव पठार (गोवा)

**शापित सूर्य**
कवी : दादू मांद्रेकर
प्रकाशक : अगस्ती प्रकाशन
आगशी - गोवा
मूल्य : ६० रु.   पृष्ठे १३४